महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर येथील गट क्र. २६३ मधील ३.७७ हेक्टर जमीन मौजे पुणतांबा गावच्या नळ पाणी पुरवठा योजनेतील साठवण तलाव, जलशुध्दीकरण केंद्र, मुख्य सतुंलन जलकुंभ व कर्मचारी निवासस्थाने इत्यादीकरीता पुणतांबा ग्रामपंचायतीस कब्जेहक्काने हस्तांतरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मशेम २०१६/प्र.क्र.९०/ल-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना :-

मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर या गावाच्या पाणीपुरवठा योजनेसाठी नळ पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलावाकरीता महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर येथील गट क्र. २६३ मधील ४ हेक्टर जमीनीची जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मागणी केलेली आहे. सदर प्रकरणी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रस्तावित नळ पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलाव, जलशुध्दीकरण केंद्र, मुख्य संतुलन जलकुंभ व कर्मचारी निवासस्थाने इत्यादीकरीता एकूण ३.७७ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने मंत्रिमंडळाच्या दिनांक ७/११/२०१७ च्या बैठकीत झालेल्या निर्णयास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर येथील गट क्र. २६३ मधील ३.७७ हेक्टर जमीन मौजे पुणतांबा गावच्या नळ पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलाव, जलशुध्दीकरण केंद्र, मुख्य संतुलन जलकुंभ व कर्मचारी निवासस्थाने इत्यादीकरीता एक विशेष बाब म्हणून चालू वार्षिक दर विवरणपत्रातील दरावर आधारित बाजारमूल्याच्या १०% रक्कम आकारून ग्रुप ग्रामपंचायत, पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर यांच्याकडे कब्जेहक्काने हस्तांतरीत करण्यास महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ क क च्या पोटकलम (३क) अन्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत जमीन हस्तांतरणाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील :-

(१) प्रस्तुतची जमीन ग्रुप ग्रामपंचायत, पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर भोगवटादार वर्ग - २ म्हणून धारण करील.

(२) सदर जमिनीचा वापर पुणतांबा गावच्या नळ पाणीपुरवठा योजनेतील साठवण तलाव, जलशुध्दीकरण केंद्र, मुख्य संतुलन जलकुंभ व कर्मचारी निवासस्थाने या प्रयोजनांसाठीच करणे बंधनकारक राहील.

(३) प्रस्तुत जमिनीच्या हस्तांतरणाकरिता चालू वार्षिक दर विवरणपत्रातील दरावर आधारित बाजारमूल्याच्या १०% रक्कम महाराष्ट्र राज्य शेती महामंडळास ग्रुप ग्रामपंचायत, पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर यांच्याकडून देण्यात आल्यानंतरच सदर जमिनीचा ताबा देण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११२३१२४१०३०८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunildatt Bhikaji Patankar

Digitally signed by Sunildatt Bhikaji Patankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5f53ca0c0de2eb56d666f3fb5b5dddd3198e215f7d689e58339a094f81b6f516, cn=Sunildatt Bhikaji Patankar
Date: 2017.11.29 15:02:55 +05'30'

(सु.भि. पाटणकर)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय ,मुंबई
८) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग
११) जिल्हाधिकारी, अहमदनगर
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर
१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे
१४) निवडनस्ती कार्यासन ल-७ (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई.